फेर जाहीर लिलाव
जिल्हा न्यायालय-१ व अति. सत्र न्यायालय, खेड

यावरुन असे कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय-१ व अति. सत्र न्यायालय, खेड या न्यायालयातील पुढील जडसंग्रहामधील वस्तू या जाहीर लिलाव करणेकरीता मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो, रत्नागिरी यांनी आदेश केला आहे. त्यास अनुसरुन सदर जडसंग्रहामधील खुर्ची क्र.६६ चे खालील वर्णन केल्याप्रमाणे त्यांचा जाहीर लिलाव करण्यात येईल. कोणताही तहकुब हुकूम दरम्यान व झाल्यास, सदरहु लिलाव ०५/०६/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता करण्यात येईल.

अ. क्र.	फर्निचर	तपशिल
१	खुर्ची क्र. ६६	केनिंग खुर्ची (केनिंग पूर्णपणे फाटलेले आहे.)

सदर लिलावांच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

१. सदर परिशिष्टातील वस्तुचे वर्णन हे न्यायालयातील डेड स्टॉक रजिस्टर मध्ये नमूद असल्याप्रमाणे बरोबर आहे. तथापि, सदर वस्तूचे जाहिरनाम्यातील वर्णनाबद्दल अगर त्यातील त्रुटींकरिता न्यायालय बंधनकारक राहणार नाहीत.

२. लिलाव करणारा अधिकारी लिलावाची रक्कम किती चढवावी हे ठरविल. लिलाव दराची लॉट संबंधी अगर मागणीदाराविषयी काही तक्रार निर्माण झाल्यास वस्तूचा फेर लिलाव करण्यात येईल.

३. सर्वात जास्त रक्कमेची मागणी करणारा तो लिलाव बोलल्यास कायदेशीररित्या पात्र आढळल्यास, वस्तूचा खरेदीदार म्हणून जाहीर करणेत येईल आणि सर्वात जास्त रक्कमेची मागणी नाकारण्याचा अधिकार खाली स्वाक्षरी करणार यांनी राखून ठेवला आहे.

४. विक्री करणा-या अधिका-यास आवश्यक वाटल्यास त्याचे तहकुबीची कारणे लेखी लिहुन विक्री तहकुब करावी.

५. वस्तुंच्या विक्रीची किंमत ही विक्रीचे वेळी द्यावी लागेल विक्री करणारा अंमलदार सांगेल त्यावेळी न्यायालयात भरावी लागेल. तशी रक्कम न भरल्यास लिलाव पुन्हा करुन वसूली फेर विक्री केली जाईल. अशा फेर लिलावाचे वेळी मुळचे किंमतीपेक्षा कमी येणारी रक्कम न भरणारे मागणीदाराकडून वसूल केली जाईल.

आज दिनांक २९/०५/२०२५ रोजी आमचे सही व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

जिल्हा न्यायाधीश-१ व
अति. सत्र न्यायाधीश, खेड

दा. ता. 02/06/2025

अधीक्षक (आस्थापना)
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी

म.जा.क्र./वित्त/ ७४६ /२०२५
जिल्हा न्यायालय-१ खेड
दिनांक - २९/०५/२०२५

प्रत, फेर जाहीर लिलावाची नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी-

१. मा. सहाय्यक अधिक्षक(वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
२. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
३. मा. तहसिलदार कार्यालय, खेड
४. मा. अधिक्षक, जिल्हा न्यायालय-१ खेड
५. मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय, खेड
६. District System Administrator यांजकडे महाराष्ट्र शासनाच्या साईटवरती प्रसिध्द करणेकरिता

फेर जाहिर लिलावमधील वस्तूंचे जडसंग्रहामधीलँ वर्णन

अ. क्र.	जडसंग्रह	नोंदवहीमधील वस्तूचा क्रमांक	जडसंग्रहामधील वस्तूची मूळ किंमत	लिलावाची किंमत
१	केनिंग खुर्ची	६६	५१५/-	१५०/-